# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक
### उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई
### एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई -४०० ००१

www.jdhemumbai.gov.in Tel & Fax No. ०२२२२६५६६००, २२६९१५२८


क्र. सहसं/उशि/मुंवि/आस्था/२०२६/४३२४ दिनांक- २९/०७/२०२६.

प्रति,

1. संचालक/प्राचार्य, शासकीय संस्था/महाविद्यालये, मुंबई
2. प्राचार्य, अशासकीय अनुदानित
   कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य
   तसेच शारीरिक शिक्षण महाविद्यालये, मुंबई विभाग.

**विषय**- दिनांक 30 जुलै रोजीच्या आयोजित **Drug Free Mumbai** सामुदायिक जनजागृती व उपक्रमात सहभागी होण्याबाबत.

**संदर्भ**- मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे पत्र जा. क्र. जिमुउप/नशामुक्त मुंबई/2026-27 दि. 28.07.2026

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, **Drug Free Mumbai** हे अभियान मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने मुंबई शहर/ उपनगर क्षेत्रात **गुरुवार, दिनांक 30 जुलै 2026 रोजी सकाळी 10.30 वाजता, एन.एस.सी.आय. डोम, वरळी, मुंबई** येथे मा. मुख्यमंत्री महोदयांचे शुभहस्ते ड्रग फ्री मुंबई या मोहिमेचा शुभारंभ होत आहे. सदर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार असून कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाची ऑनलाईन लिंक पुढीलप्रमाणे- **https://webcast.gov.in/maharashtra/** देण्यात येत आहे. सदर कार्यक्रमात ऑनलाईन लिंक द्वारे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी यांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सदर कार्यक्रम विद्यार्थ्यांना एकत्रितपणे पाहता यावा व प्रतिज्ञा घेता यावी यासाठी महाविद्यालयाच्या सभागृहात **Live Screen/Projector/TV** व व साऊंड सिस्टीम ची योग्य व्यवस्था करण्यात यावी.

कार्यक्रमाच्या वेळी मा. मुखमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी "Drug Free Mumbai" ची सामुहिक शपथ घेतल्यानंतर संबंधीत शैक्षणिक संस्थेचे प्राचार्य / संचालक यांनी **https://www.drugfreemumbai.org** या संकेतस्थळावरील **Take a Pledge** या ठिकाणी भेट देऊन आपण/विद्यार्थ्यांनी "Drug Free Mumbai" बाबत घेतलेल्या शपथेचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवून देण्याकरिता आवश्यक ते सहाय्य करणेबाबत त्यांच्या प्राध्यापकांना निर्देश द्यावेत.

सदर कार्यक्रम हा युवकांच्या/विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याबाबत अत्यंत संवेदनशील असल्याने याची चोख अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही त्या शैक्षणिक संस्थेच्या प्राचार्य / संचालक यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(डा. रुपेश राऊत)
सहसंचालक, उच्च शिक्षण मुंबई विभाग

सोबत: अंमली पदार्थ व्यसन मुक्ती शपथ आणि ऑनलाईन थेट प्रक्षेपणासाठी सूचना.

# ❖ अंमली पदार्थ व्यसनमुक्ती शपथ ❖

मी, भारताचा सुजाण व दक्ष नागरीक म्हणून गांभीर्यपूर्वक

शपथ घेतो / घेते की,

मी, माझ्या आयुष्यात अंमली पदार्थ किंवा तत्सम नशाजन्य

पदार्थांचे सेवन करणार नाही,

तसेच, माझे कुटुंब, मित्र व समाजाला सेवन करण्यापासून

जागरूक व परावृत्त करीन.

अंमली पदार्थ सेवनाचे होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी व

एक निरोगी, सुदृढ, सुरक्षित आणि व्यसनमुक्त  समाज घडविण्यासाठी,

देशाच्या युवा शक्तींना नशेच्या विघातक मार्गापासून परावृत्त करून,

त्यांच्या ऊर्जेचा वापर राष्ट्रनिर्माण व देशाची प्रगती

करण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करेन !

व्यसनमुक्त कुटुंब, अंमली पदार्थ मुक्त मुंबई, समर्थ भारत !

जय हिंद, जय महाराष्ट्र !!

## ऑनलाइन थेट प्रक्षेपणासाठी सूचना

1. ऑनलाइन थेट प्रक्षेपणासाठी मोठ्या सभागृहाची व्यवस्था करावी व जास्तीत जास्त विद्यार्थी जमतील याची व्यवस्था करावी.
2. सर्व महाविद्यालयांनी सकाळी 10.30 वाजता ऑनलाइन लिंकद्वारे कार्यक्रमात सहभागी व्हावे.
३. कार्यक्रमासाठी प्रोजेक्टर/स्क्रीन, ध्वनीव्यवस्था आणि विश्वसनीय इंटरनेट कनेक्शन पूर्वतयारीने उपलब्ध ठेवावे.
4. सभागृहातील दुतर्फा (Two-way) कॅमेऱ्याची व्यवस्था करावी, जेणेकरून मा. मुख्यमंत्री महोदयांना सहभागी विद्यार्थी दिसतील.
5. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते ऑनलाइन व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ दिली जाईल. सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धपणे शपथ घ्यावी.
6. कार्यक्रमादरम्यान उपस्थिती दर्शविणारी छायाचित्रे काढून ती संबंधित समन्वयक/व्हॉट्सअॅप समूहावर पाठवावीत.

**Facebook:** drugfreemumbai

**Instagram:** drugfreemumbai_official

**Website:** drugfreemumbai.org

**Hashtag:** #DrugFreeMumbai